कार्यालय
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर.
आवक क्र. 214
10 JAN 2013
सहाय्यक आयुक्त का. अ.

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन पत्र क्रमांक :- एसटीएस-२०११/प्र.क्र. ४३९/अजाक-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ६ डिसेंबर, २०१२.

वाचा : १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विघयो-२००८/प्र.क्र.३१०/विघयो-१ दि.१४ फेब्रुवारी, २००८.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विघयो-२००८/प्र.क्र.३१०/विघयो-१ दि.७ मे, २००८.

प्रस्तावना :- संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर पॉवर टिलरचा पुरवठा करण्याची योजना सन २००७-२००८ या वित्तीय वर्षापासून राबविण्यात येत आहे. तथापि, पॉवर टिलरची उपयुक्तता कमी असून त्याचा वापर पूर्णपणे केला जात नाही. असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे या योजनेमध्ये सुधारणा करुन अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९०% अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:- अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर पॉवर टिलरचा पुरवठा करण्याची योजना बंद करण्यात येत आहे. त्याऐवजी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९०% अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने कल्टिव्हेटर किंवा रोटॅव्हेटर व ट्रेलर यांचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत :-

i) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असावेत.

ii) स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान ८०% सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत.

iii) मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मर्यादा रु. ३.५० लाख इतकी राहील. स्वयंसहाय्यता बचत गटांनी वरील कमाल मर्यादेच्या रक्कमेच्या १०% स्वहिस्सा भरल्यानंतर ९०% (कमाल रु. ३.१५ लाख) शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

iv) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी संबधित जिल्हयातील इच्छुक स्वयंसहाय्यता बचत गटांची यादी आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करावी. उपलब्ध

(2)



तरतूदींच्या अनुषंगाने अर्जदारांची संख्या जास्त असल्यास आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पारदर्शक पद्धतीने (लॉटरी पद्धत) लाभार्थ्यांना वाटप करावे. निवड करण्यात आलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांची नावे व पत्ते आयुक्तालयाच्या कार्यालयात तसेच जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गटांची नावे व पत्ते जिल्हा कार्यालयाच्या फलकावरती लावण्यात यावीत.

v) मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांची खरेदी महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळ ,महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांच्यापैकी एका संस्थेमार्फत कमीत कमी दरात व त्यास शासनाची मान्यता घेऊन करण्यात यावी.

vi). सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी पुरवठा करण्याचे ठिकाण निश्चित करावे. सदर स्थानावर मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पोहचविण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार संस्थेची राहील. या स्थानावर किमान १० लाभार्थी असावेत याची खात्री संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी करावी.

vii) ज्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. त्या स्वयंसहाय्यता बचत गटांना सदरहू यंत्र चालविण्याचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार संस्थेची राहील. प्रशिक्षण घेतलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी संस्थेकडून व्यवस्थित प्रशिक्षण मिळाल्याचे लेखीपत्र सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना सादर करणे बंधनकारक राहील व त्याची एक प्रत प्रशिक्षण दिलेल्या संस्थेकडे पाठवावी .

viii) सदर योजनेचा लाभ निवडलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांनांच मिळाला पाहिजे यासाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने स्वयंसहाय्यता बचत गटांपर्यंत पोहचल्यानंतर त्याची मूळ पोचपावती व प्रशिक्षण मिळालेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांचे पत्र सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्या मार्फत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावे. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मूळ पावती (Original Receipt) शासनाला सादर करावी.

ix) ट्रॅक्टरच्या दर्शनी भागावर महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत अर्थसहाय्य असे लिहिण्यात यावे.

x) प्रत्येक जिल्ह्यामध्ये किती स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप करावे याबाबत शासनाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

xi) या योजनेंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने त्यांना देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर इतर शेतकऱ्यांना भाडेतत्वावर देऊ शकेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत त्याला मिनी ट्रॅक्टर विकता येणार नाही अथवा सावकार किंवा अन्य व्यक्तीकडे गहाण ठेवता येणार नाही. लाभार्थीने मिनी ट्रॅक्टर विकल्यास किंवा गहाण ठेवल्यास सदर व्यवहार बेकायदेशीर ठरवून स्वयंसहाय्यता बचत गटांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच, संबंधित स्वयंसहाय्यता बचत गटांकडून शासनाने मिनी ट्रॅक्टरच्या खरेदीसाठी खर्च केलेली संपूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल आणि संबंधित स्वयंसहाय्यता बचत गटांना

..४



Scanned with ACE Scanner

शासनाच्या अन्य योजनांचे लाभ घेण्यास किमान [illegible] वर्षे अपात्र ठरविले जाईल. तशा आशयाचे हमी पत्र स्वयंसहाय्यता बचत गटांकडून घेण्यात यावे.

xii) ज्या स्वयंसहाय्यता बचत गटांना या योजनेंतर्गत मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले आहे. अशा स्वयंसहाय्यता बचत गटांनी किमान १० वर्षे तो मिनी ट्रॅक्टर उपयोगात आणावा या हेतूने मिनी ट्रॅक्टर मिळाल्यापासून किमान १० वर्षापर्यंत स्वत:हून दरवर्षी १० मे पूर्वी संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना नोंदणीकृत डाकेने पत्र पाठवून त्याला देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर विकला नसल्याचे किंवा गहाण ठेवला नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

xiii) ज्या लाभार्थ्यांना पावर टिलरचा लाभ दिला आहे. त्या लाभार्थींना या योजनेचा पुन्हा लाभ घेता येणार नाही.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४५८/१२/व्यय-१४, दिनांक २८/९/२०१२ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर दर्शविण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१२१२०६१५०२१११६२२ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(था. सु. लायडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सह आयुक्त, समाजकल्याण (अनुसूचित जाती उपयोजना), महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण
सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग
व्यवस्थापकीय संचालक ,महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळ ,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ ,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ,मुंबई
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व),
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,
मा.अध्यक्ष, अनुसूचित जाती / जमाती आयोग,
मा.प्रधान सचिव, कृषि विभाग,मंत्रालय,मुंबई,
निवड नस्ती, का-अजाक-१.

-------

E:\2012\power trailor Copy of GR 2010

Scanned with ACE Scanner